## जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय


**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**

**फोन नं ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- २४३** **दिनांक :- ०६/०९/२०२१**

### ‘‘प्रेमभंग झाल्याने नैराश्यातून आत्महत्या करणाऱ्या तरुणाचे वालीव पोलीसांनी वाचवले प्राण’’

वालीव पोलीस ठाणे हद्दीत नवजीवन गावदेवी मंदीर टेकडी येथे इसम नामे सद्दाम कुरेशी वय २७ वर्षे, याचा प्रेमभंग झाल्याने नैराश्यापोटी टेकडीवर जावून टेकडीवरुन त्याने मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. एस. जयकुमार यांच्या मोबाईलवर फोन करुन आत्महत्या करत असल्याची माहिती दिली. सदरबाबत मा. अपर पोलीस आयुक्त यांनी आत्महत्या करणाऱ्या मुलाचा मोबाईल नंबर व फोटो याची माहिती मोबाईल फोनद्धारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे वालीव पोलीस ठाणे यांना तात्काळ देवून कोणत्याही परिस्थितीत सदर मुलाचे मन आत्महत्या करण्यापासून परावृत्त करून त्यास सुरक्षित त्याच्या पालकांच्या ताब्यात देण्याचे आदेश दिल्याने व.पो.नि. यांनी तात्काळ पेल्हार बीट अधिकारी स.पो.नि. सोपान पाटील यांना तसेच पोलीस ठाणे व्हॉटसॲप ग्रुपवर आत्महत्या करणाऱ्या मुलाचा फोटो व फोन नंबरबाबत माहिती देवून सदर ठिकाणी जावून आत्महत्या करण्यापासून सदर मुलाचे मन परावृत्त करण्याबाबत सुचित केले.

सदर आदेश प्राप्त होताच पेल्हार बिटचे स.पो.नि. सोपान पाटील, पो.शि. ०७१२१४/श्रीकांत पाटील व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.शि. १४७/सचिन बळीद व पो.शि. १४९/बालाजी गायकवाड यांनी क्षणाचाही विलंब न लावता नवजीवन झोपडपट्टी येथील गावदेवी मंदीर टेकडीवर जावून तेथे आत्महत्या करण्यासाठी गेलेला मुलगा नामे सद्दाम सलीम कुरेशी वय २७ वर्षे यास विश्वासात घेवून त्यास आत्महत्या करण्यापासून त्याचे मन परावृत्त करुन ताब्यात घेतले व पोलीस ठाणे येथे व.पो.नि. वालीव पोलीस ठाणे यांचे समक्ष हजर केले असता व.पो.नि. वालीव पोलीस ठाणे यांनी आत्महत्या करणारा तरुण नामे सद्दाम कुरेशी वय २७ वर्षे यास आत्महत्या करण्याचे कारण विचारले असता त्याने सांगितले की, त्याचे त्याच्या मावशीच्या मुलीवर प्रेम होते व तिच्यासोबत त्याचे लग्न ठरले होते. परंतू सदर मुलीने त्यास काहीएक न सांगता दुसऱ्या मुलासोबत लग्न केल्याने त्याचा प्रेमभंग झाला. त्यामुळे तो बऱ्याच दिवसांपासून नैराश्यामध्ये होता. म्हणून त्याने स्वत:चे जिवन संपविण्याचा निर्णय घेतला होता. व.पो.नि. श्री. कैलास बर्वे यांनी सदर मुलास आत्महत्या करण्यापासून त्याचे समुपदेशन करून त्याचे वडील नामे सलीम अब्दुल कुरेशी वय ५४ वर्षे, व्यवसाय-टेलर, रा. तवक्कल वेल्फेअर सोसायटी, गेट नं. ०७, मालाड (प.), मुंबई यांना पोलीस ठाण्यास बोलावून सदर मुलास त्यांच्या ताब्यात दिले.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, श्री. एस. जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणे वरीष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, स.पो.नि. सोपान पाटील, पो.शि. ०७१२१४/श्रीकांत पाटील, पो.शि. १४७/सचिन बळीद व पो.शि. १४९/बालाजी गायकवाड यांनी केलेली आहे.


महाराष्ट्र पोलीस